नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २४/०३/२०२५ ( सोमवार ) सकाळ

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ८ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ८ आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंद करण्याता आले आहे.

**१.पोलीस स्टेशन बेला** अंतर्गत पोलीस पेट्रोलीग करीत असतांना त्यांनी आरोपी **नामे राहुल धर्मराज मसराम वय २३ वर्ष रा सिर्सी उमरेड जि नागपुर ,हा** मौजा सिर्सी बस स्टॅंड च्या मागे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

२. **पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत खापा पोलीस रात्री पेट्रोलीग करीत असतांना त्यांनी आरोपी नामे **विकास मखनलाल सहारे वय ३९ वर्ष रा हंपायर रोड इंडीयन जीमखाण्या जवळ नागपूर शहर** नागपूर ,आरोपी **नामे वृषभ गणेश कुंभरे वय २५ वर्ष रा झेंडा चौक धंतोली तकीया नागपूर शहर , आरोपी नामे रोशन गंगाधर वाघ वय ३६ वर्ष रा धंतोली तकीया नागपूर शहर आणि आरोपी नामे राजेन्द्र बालुलाल खरे, वय ४६ वर्ष रा ईमामवाडा पोलीस स्टेशनचे मागे नागपुर शहर हे चार ही आरोपी मौजा** वाकी दरबार येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

३. **पोलीस स्टेशन अरोली** अंतर्गत पोलीस पेट्रोलीग करीत असतांना त्यांनी आरोपी **नामे धर्मेद्र रामभाउ वाटकर वय ३३ वर्ष ,रा. अडेगाव मौदा ,हा** अडेगाव मौदा येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला

४.**पोलीस स्टेशन कन्हान** अंतर्गत कन्हान पोलीस पेट्रोलीग करीत असतांना त्यांना आरोपी **नंदकूमार बुधुराम विश्वकर्मा वय २१ वर्षे रा. कालीमंदिर जवळ खंदान नं. ०३ कामठी कॉंलरी कन्हान आणि समीर शिवप्रसाद कश्यप वय १९ वर्षे रा. कालीमंदिर जवळ खंदान नं. ०३ कामठी कॉंलरी कन्हान** हे मौजा खंडाळा शिवारातील रेल्वे पटरी

जवळ कन्हान येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला नमुद ८ आरोपीतांविरूध्द कलम २७ गुंगीकार औषधीदव्य आणि मनोवयापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आले आहे.

**मा.प्रथमवर्ग न्यायालय कुही यांनी ३ आरोपीतांविरूद कलम ८२ फौजदारी प्रक्रीया संहीता अन्वये जाहीरनामा काढला**

मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कुही श्री नरेश देशमुख यांनी ३ आरोपीतांविरूद कलम ८२ फौजदारी प्रक्रीया संहीता अन्वये जाहीरनामा काढला असुन सदर आरोपी हे कोर्टात हजर येत नसल्याने त्यांना हजर होण्याबाबत आदेशीत करण्यात आले आहे.अन्यथा त्यांचे वर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणारे आहे.

१. आरोपी नामे **चिराग राजेंद्र मेश्राम ,अंतुजी नगर ,भांडेवाडी ,नागपुर** याचे वर पोस्टे कुही येथे कलम ३६३ भादवि अन्वये गुन्हा नोंद असुन सदर गुन्हयचा खटला मा प्रथमवर्ग न्यायालय कुही येथे सुरू असुन सदर आरोपी हा मा न्यायालयात हजर होत नसल्याने मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी सदर आरोपीतांविरूद कलम ८२ फौजदारी प्रक्रीया संहीता अन्वये जाहीरनामा काढला असुन सदर आरोपी ला कोर्टात २८.०३.२०२५ रोजी हजर होण्याबाबत आदेशित केले आहे.
२. आरोपी नामे **प्रेमिला अशोकराव ठाकरे,रा विदर्भ सोसायटी रोड,कुंभलकर कॉलनी गणेशपेठ, नागपुर** याचे वर पोस्टे पोस्टे कुही येथे कलम ४२० भादवि अन्वये गुन्हा नोंद असुन सदर गुन्हयचा खटला मा प्रथमवर्ग न्यायालय कुही येथे सुरू असुन सदर आरोपी हा मा न्यायालयात हजर होत नसल्याने मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी सदर आरोपीतांविरूद कलम ८२ फौजदारी प्रक्रीया संहीता अन्वये जाहीरनामा काढला असुन सदर आरोपी ला कोर्टात २८.०३.२०२५ रोजी हजर होण्याबाबत आदेशित केले आहे.
३. आरोपी नामे **सुनिलकुमार तजनलाल मनेश्वर , रा. खरबी, नागपुर** याचे वर पोस्टे पोस्टे कुही येथे कलम ३५३,३९२,३७९,३२३,३४ भादवि अन्वये गुन्हा नोंद असुन सदर गुन्हयचा खटला मा प्रथमवर्ग न्यायालय कुही येथे सुरू असुन सदर आरोपी हा मा न्यायालयात हजर होत नसल्याने मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी सदर आरोपीतांविरूद कलम ८२ फौजदारी प्रक्रीया संहीता अन्वये जाहीरनामा काढला असुन सदर आरोपी ला कोर्टात ०३.०४.२०२५ रोजी हजर होण्याबाबत आदेशित केले आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर